# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 18/10/2019 (शुक्रवार)
# (सायंकाळ)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. मौदा :- दिनांक 18/01/2018 चे 14.56 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप. क्र. 27/2018 कलम 354, 354 (अ) (2)(3), 354 (ड), 506 भादवी सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 18/01/2018 चे 11.30 वा. दरम्यान 17 वर्षीय पिडीत/फिर्यादी ही तिच्या मैत्रीणीसह चिरव्हा येथून शाळेतुन परत येत असतांना आरोपी नामे – प्रवीण कवडु गोमकर, वय 28 वर्ष, रा. चिरव्हा याने पिडीतेचा पाठलाग करून तिला थांबवुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 18/01/2018 चे 19.51 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. सोमनाथ टापरे, पो.स्टे. मौदा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक 18/10/2019 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. के. जी. राठी, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 (अ)(ड) भादंवि. मध्ये 1 वर्ष सश्रम कारावास व 1000/-रु. दंड व दंड न भरल्यास 2 महिने शिक्षा, अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. मोटघरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. अरूण भुरे, श्री. प्रमोद पाटील, राजेन्द्र वानखेडे, बेनीश्याम तालेवार, पोहवा श्री. शेखर मेश्राम यांनी मदत केली आहे.

## अकस्मात मृत्यु

1) पो.स्टे. काटोल :- अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा ढवळापुर शिवार दिनांक 17/10/2019 चे 15:15 वा. ते 17:15 वा. दरम्यान यातील राजु श्रीधर प्रसाद(भारती), वय 30 वर्ष, रा. दरश मोतीराम अड्डा रोड, बेंसाद बगीचा गोरखपुर(उ.प्र.) चालत्या रेल्वेतुन खाली पडुन गंभीर जखमी झाला. त्यास लोकांनी उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- सुनिल कुमार श्रीगोंदप्रसाद, वय 30 वर्ष, रा. पकडी ता, हाटा जि. कुशीनगर (युपी), ह. मु. आयुष मार्केटीग, गांधीबाग नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा अरूण भेंडे हे करीत आहेत.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 7 कि. मी. अंतरावर मौजा जाटलापुर बस स्टॉप दिनांक 10/10/2019 चे 09:00 वा. दरम्यान यातील सुरज संतोषराव लांजेवार, वय 38 वर्ष, रा. मासोद हा त्याच्या एमएच–40/1398 क्रमांकाच्या ऑटोला चालवित असतांना मासोद वरून कोझाळी कडे येत असता जाटलापुर बसस्टॉपच्या समोर नाल्यामध्ये ऑटो पलटी झाल्याने त्याच्या छातीला लोखंडी तार लागले. सुरज लांजेवार यास उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता उपचारा दरम्यान दिनांक 10/10/2019 चे 11:05 वा. त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनिल कुमार श्रीगोंदप्रसाद, वय 30 वर्ष, रा. पकडी ता, हाटा जि. कुशीनगर (युपी), ह. मु. आयुष मार्केटीग, गांधीबाग नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा अरूण भेंडे हे करीत आहेत.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावर नक्षी येथे दिनांक 17/10/2019 चे 05:00 वा. दरम्यान स्वपनील रमेश भजभुजे, वय 55 वर्ष, रा. नक्षी याने इलेक्ट्रीशीयन ट्रेनिंग करून सुद्धा काम मिळत नसल्यामुळे घराच्या फाटयाला दुप्पटयाने गळफास लावल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रमेश कवडूजी भजभुजे, वय 55 वर्ष, रा. नक्षी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भिवापुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा यादव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर